प्रेसनोट दि २४/१०/२०१७.

## अल्पवयीन मुलीस अपहरण करुन बलात्कार व निर्घुण खुन करणारा नराधम पोलीसांकडुन गजाआड

सिंहगड रोड परिसरातील लगड मळा भागातुन मजुर दाम्पत्यांची अडीच वर्षीय चिमुकलीस आई जवळुन झोपलेल्या अवस्थेत तिचे दि २१/१०/१७ रोजी रात्रौ २३.०० ते २३.३० वा सुमारास अपहरण करुन तिच्यावर लैगींक आत्यावर करुन गळा आवळुन, निर्घुण पणे खुन केला म्हणुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ३४१/२०१७ भा.द.वि.कलम ३६३,३०२,३७६(आय), ३७६(जे), ३७६(अ), २०१,३६४, तसेच बाललैगींक आत्याचार अधिनियम कलम ४,६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दि २२/१०/१७ रोजी रात्री १२.३० वा सुमारास मुलीच्या आईने १०० नंबर वर पोलीसांना फोन करुन रात्री ११.०० ते १२.०० वा सुमारास अपहरण झाल्याची माहिती दिली. या माहितीवरुन पोलीस तपास कामी तात्काळ रात्री १२.४५ वा सुमारास घटनास्थळी दाखल झाले व सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर तसेच गुन्हे शाखेची पथके यांनी रात्रभर मुलीचा शोध घेतला व त्या दरम्यान पहाटे ५.०० वा सुमारास सिंहगड रोड पो स्टे पुणे शहर गु.र.नं.३४१/२०१७ भादवि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. मुलीच्या शोध घेत असताना सकाळी उजेड झाल्यानंतर अंदाजे ६.४५ वा सुमारास पोलीसांना सदर मुलीचा मृतदेह एका झाडाझुडपात आढळला. मुलीची ओळख पटवुण सदर मृतदेह मृत्यचे नक्की कारण तसेच लैगींक आत्याचाराबाबत खात्री करण्याकरीता ससुन हॉस्पीटल, पुणे येथे शवविच्छेदनाकरीता पाठविण्यात आला व प्राथमीक अहवाल प्राप्त झाल्यानंतर गुन्ह्यामध्ये भादवि कलम ३०२,२०१,३७६,३६४, बाल लैगींक आत्याचार अधिनियम सन २०१२ चे कलम ४,६ ची वाढ करण्यात आली. दरम्यान गुन्ह्याचे जलद तपासासाठी गुन्हे शाखा, सिंहगड रोड पोलीस स्टेशन तसेच परिमंडळ २ मधिल इतर पोलीस स्टेशन स्तरावर विविध पथके नेमुण त्यांना तपासाच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

या पथकांमधील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मागील तिन दिवसात अथक परिश्रम घेत तपासामध्ये अनेक साक्षीदार तसेच संशयीत यांचेकडुन माहिती मिळवुण त्या आधारे एक एक कडी जोडत तपास करत आरोपी निष्पन्न केला. उपलब्ध झालेल्या त्या दुव्यांच्या आधारे गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक सपोनि गवळी व त्यांच्या टिमने आरोपी नामे अजय ऊर्फ बबलु रामेश्वर चौरे, वय २३ वर्षे व्यवसाय पेंटींग काम, रा धायरी गाव, पुणे यास अखेर ताब्यात घेतले व त्याचेकडे चौकशी दरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली असुन त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. अधिक तपास चालु आहे.


पुणे शहर पोलीस